:DHS, Latur

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य



| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (बै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६<br>२६०५८७३९<br>२६०५८१३९<br>२६०५८४७६ | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे,पुणे १<br>फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८१५९<br>ई-मेल नं.adhscell@vsnl.net |
| आरोग्य सेवा<br>परिपत्रक क्र.११ | | जा.क्र.राकुकका/आरसीएच/कु.नि.नसबंदी शिबीर/कक्ष-८/न.क्र.१९/४४०२-४६३२/०८<br>दिनांक :- २४.०१.२००८. |



प्रति,

१. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ............... (सर्व)
२. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय ................ (सर्व)
३. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका ........... .(सर्व)
४. कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

विषय :- कुटुंब नियोजन नसबंदी शस्त्रक्रिया शिबीरे आयोजित करणे व आर-३ रजिस्टर ठेवण्याबाबत.

संदर्भ :- आरोग्य सेवा संचालनालयाचे दि.२७.७.२००७ चे परिपत्रक क्रमांक १.

संदर्भित परिपत्रकान्वये नसबंदी शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करणे, नसबंदी शस्त्रक्रियेच्या कामात खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांचा सहभाग घेणे, नसबंदी शस्त्रक्रिया झालेल्या संस्थेच्या ठिकाणी (शासकीय / खाजगी) आर-३ रजिस्टर ठेवणे, नसबंदी शस्त्रक्रिया शिबीरासाठी ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय इ.ठिकाणी उपलब्ध असलेल्या शस्त्रक्रिया गृहे व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग घेऊन जिल्हयाचे वार्षिक उद्दीष्ट गुणात्मकरित्या पूर्ण होईल अशी कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तरी त्यानुसार आजतागायत कार्यवाही होत नसल्याचे राज्यस्तरावरील अधिकाऱ्यांचे क्षेत्रिय भेटीच्या वेळी निदर्शनास आले आहे.

क्षेत्रिय भेटीच्या वेळी आढळून आलेल्या महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे आहे.

१) ग्रामीण रुग्णालय / उप जिल्हा रुग्णालय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या नसबंदी शस्त्रक्रिया मध्ये ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी व नर्सिंग स्टाफचा सहभाग अत्यल्प आहे.
२) ग्रामीण रुग्णालय / उप जिल्हा रुग्णालय स्तरावर बऱ्याच ठिकाण अद्याप आर-३ रजिस्टर पुरविलेले नाही.
३) ग्रामीण रुग्णालय / उप जिल्हा रुग्णालय स्तरावर झालेल्या नसबंदी शस्त्रक्रिया प्रा.आ.के.वैद्यकीय अधिकारी आपआपसामध्ये आणखी विभागून घेण्याची कार्यवाही चालू आहे.
४) जिल्हयातील खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांचे नर्सिंग होम जास्तीत जास्त नसबंदी शस्त्रक्रियेसाठी (पुरुष/स्त्री) मानांकित करण्याबाबत सुचना देवूनही अपेक्षेप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

D:\VINOD-JAI\VINOD.doc

५) खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांच्या नर्सिंग होमच्या ठिकाणी झालेल्या नसबंदी शस्त्रक्रियेबाबतचे आर-३ रजिस्टर संबंधित संस्थेत ठेवण्याची कार्यवाही बऱ्याच ठिकाणी सुरु झालेली नाही.

६) मानांकित केलेल्या खाजगी वैद्यकीय व्यवसायिक / स्वयंसेवी संस्थेच्या दवाखान्यात झालेल्या नसबंदी शस्त्रक्रियांचे व्हाऊचर्स प्राप्त करुन घेऊन त्यांना अनुदान प्रतिपूर्ती करण्याबाबत नजिकचे प्रा.आ.केंद्र, किंवा ग्रामीण रुग्णालय निश्चित करण्याबाबत संदर्भित परिपत्रकामध्ये सुचना देवून सुध्दा तशी कार्यवाही केलेली नाही.

वरील सर्व त्रुटींची पहाणी केली असता जिल्हास्तरीय अधिकारी या नात्याने कार्यक्रमाकडे आपण गांभिर्याने लक्ष दिलेले नाही. नसबंदी शस्त्रक्रियेच्या कार्यक्रमाचे गुणात्मक व संख्यात्मक सुधारणा होण्याच्या दृष्टीने आपणांस खालीलप्रमाणे स्पष्ट सुचना देण्यात येत आहेत. त्याबाबतची तंतोतंत कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

१) सर्व प्रा.आ.केंद्रे, ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी दर आठवडयाला निश्चित दिवशी नसबंदी शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करावे. त्यामध्ये टाक्याच्या स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया व पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया होतील अशी कार्यवाही करावी. त्याबाबतचा जिल्हयाच्या एकत्रित कार्यक्रम जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांचे स्वाक्षरीने उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ व या कार्यालयास पाठवावेत.

२) बिन टाक्याच्या नसबंदी शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन लॅप्रोस्कोपिक सर्जनच्या उपलब्धतेनुसार, उपलब्ध लाभार्थ्यांच्या संख्येनुसार ग्रामीण रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय, इतर रुग्णालयाच्या ठिकाणी दरमहा आयोजित करावा. सदरहू कार्यक्रम जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने निश्चित करावा. त्याची प्रत उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ व या कार्यालयास नियमितपणे पाठवावी. प्रत्येक लॅप्रोस्कोपिक शिबीरात फक्त २५ लाभार्थ्यांवर बिनटाक्याची स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया होतील अशी कार्यवाही करावी. एका लॅप्रोस्कोपीक सर्जनला दररोज २ पेक्षा जास्त लॅप्रोस्कोपिक शिबीरात शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी सोपवू नये.

३) जिल्हयातील ग्रामीण, शहरी व महानगरपालिका क्षेत्रात खाजगी वैद्यकीय व्यवसायिक व स्वयंसेवी संस्था यांच्या दवाखान्याचे मानांकन करण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक यांनी करावी. त्यासाठी केंद्र शासनाच्या दि.८.९.२००६ च्या मार्गदर्शनपर सुचनांनुसार कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी. <u>मानांकन केल्याशिवाय कोणत्याही खाजगी वैद्यकीय व्यवसायिक/स्वयंसेवी संस्थेच्या दवाखान्यात झालेल्या नसबंदी शस्त्रक्रियेच्या लाभार्थ्यांना कोणताही शासकीय मोबदला दिला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.</u> जिल्हयात मानांकित केलेल्या खाजगी वैद्यकीय व्यवसायिक/स्वयंसेवी संस्थांच्या दवाखान्याची माहिती सोबतच्या प्रपत्रात भरुन या कार्यालयास त्वरीत पाठवावी व त्यामध्ये झालेल्या बदलाची (वाढ/घट) माहिती वेळोवेळी मंडळाचे उप संचालक व या कार्यालयास सादर करावी.

४) नसबंदी शस्त्रक्रियेसाठी मानांकित केलेल्या सर्व खाजगी संस्था व नसबंदी शस्त्रक्रिया होत असलेल्या सर्व शासकीय संस्थेच्या ठिकाणी आर-३ रजिस्टर ठेवण्याची कार्यवाही करावी.

५) ग्रामीण रुग्णालय / उप जिल्हा रुग्णालय या रुग्णालयाच्या ठिकाणी आयोजित केलेल्या नसबंदी शस्त्रक्रिया (टाक्याचे/बिन टाक्याचे) शिबीरात संबंधित संस्थेचे वैद्यकीय अधिक्षक, वैद्यकीय अधिकारी व इतर नर्सिंग स्टाफचा १००% सक्रिय सहभाग असावा.

६) ग्रामीण रुग्णालय / उप जिल्हा रुग्णालय स्तरावर उपलब्ध असलेले पलंग, गादया व इतर साहित्यांचा उपयोग नसबंदी शस्त्रक्रियेच्या रुग्णास होईल याची दक्षता घ्यावी.

७) नसबंदी शस्त्रक्रियेसाठी दि.१३.१२.२००७ च्या शासन निर्णयानुसार वाढीव अनुदानाबाबत व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देवून दि.१.११.२००७ पासून झालेल्या सर्व नसबंदी शस्त्रक्रियेच्या लाभार्थ्यांना वाढीव अनुदान दिले जाईल अशी कार्यवाही करावी. सदरहू योजनेस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करुन नसबंदी शस्त्रक्रिया ही बाब आरोग्य विषयक कार्यक्रमातील एक नियमित बाब होईल याची दक्षता घ्यावी. त्यानुसार जिल्हयाचे गुणात्मक व संख्यात्मक कामात सुधारणा होऊन संरक्षित जोडप्यांचे प्रमाण वाढवून राज्याची लोकसंख्या नियंत्रणात राहील अशी कार्यवाही करावी.

सहपत्र - (१)
प्रपत्र.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,
कु.क.माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.

प्रत अग्रेषित :-

१) प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ...........(सर्व)
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ................(सर्व)
३) जल्हाधिकारी, ...........................................(सर्व)
४) आयुक्त, महानगरपालिका, ..............................(सर्व)
५) उप संचालक, आरोग्य सेवा, ........... मंडळ, ..........(सर्व)
६) कार्यक्रम प्रमुख / नोडल ऑफीसर.........................(सर्व)

प्रत सादर :-

१) मा.अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
२) मा.संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.
३) मा.सचिव तथा आयुक्त, कुटुंब कल्याण सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.